महाराष्ट्र शासन

*Assistant Director & Public Prosecutor, Nanded*

**सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, नांदेड.**

यांचे कार्यालय डॉ.काबरा यांच्या दवाखान्या शेजारी, पोलीस अधीक्षक कार्यालया समोर, वजिराबाद, नांदेड

☎ 02462 – 248124 **E-mail: adpp.nd-mh@gov.in / ppoffned@gmail.com**

जा. क्र. : ससंवसअ/नांदेड/अस्था / 527 /2021 दिनांक : 31/08/2021

**वाचा :-** 1. मा. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.सबअ/104/1252/2021 दि. 13/08/2021

2. या कार्यालयाचे कार्यालयीन पत्र जा.क्र. ससंवसअ/नांदेड/आस्था/490/2010 दि.18/08/2021

3. मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र.2021-आरबी-1-डेस्क-2-टे-(4)-विससअ-प्र.क्र.24 दि. 28/08/2021.

**-: अधिसूचना :-**

**विषय : सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्या नेमणुका नसलेल्या नांदेड जिल्हयातील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 25 (3)अन्वये 19 विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तात्पुरते स्वरुपात पॅनल तयार करणे बाबत.**

मा. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र सबअ/104/1252/2021 दि. 13/08/2021 तसेच मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे कार्यालयीन पत्र जा. क्र. 2013-आरबी-1-डेस्क-2-टे-(4)-विससअ-प्र.क्र.24 दि. 28/08/2021 द्वारे दिलेल्या प्रदान अधिकाराचा वापर करुन नांदेड जिल्हयातील नियमीत सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक नसलेल्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयामध्ये फौजदारी खटले चालविण्याकरीता तात्पुरत्या स्वरुपात निव्वळ मानधनावर नियुक्ती देण्याच्या दृष्टीने 19 विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता + 10 प्रतिक्षा सुची विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांची नामिका (पॅनल) तयार करणे करीता पात्रता धारक वकिलांकडून आवेदन पत्र मागविण्यात येत आहे. ***दि.01/09/2021*** **ते** ***दि. 15/09/2021*** या कालावधीत सायंकाळी 5:45 वाजेपर्यंत वा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत स्विकारले जातील. नमुद तारखेनंतर आलेली आवेदन पत्रे स्विकारली जाणार नाहीत.

**पात्र उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे अटी असतील :-**

1) उमेदवार कायदयाचा पदवीधर असावा.

2) अर्जाच्या दिनांकास शासनाच्या दिनांक 25 एप्रिल 2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार 5 वर्षाने शिथिलतेमुळे खुल्या प्रवर्गातील अर्जदाराचे वय 38 वर्षे व मागासवर्गीय प्रवर्गातील अर्जदाराचे कमाल वयोमर्यादा 43 वर्षे राहील.

3) उमेदवाराने वयासंबंधीताचा विधीग्राह्य पुरावा सादर करावा.

4) उमेदवाराने महाराष्ट्र बार कॉन्सीलकडे पंजीकरण केलेले असावे.

5) उमेदवाराने पाच वर्ष वकिली व्यवसाय केलेला असावा आणि तद्संबंधीत मा. न्यायधिशांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची पत्र आवेदनपत्रासोबत जोडणे बंधनकारक राहील.

6) उमेदवाराने मागिल तीन वर्षापासून विविध न्यायालयामध्ये चालविलेल्या फौजदारी खटल्याचा गोषवारा आवेदन पत्रासोबत सादर करावा.

7) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असावे. त्याचप्रमाणे मराठीचे इंग्रजीत व इंग्रजीचे मराठीत भाषांतर करता आले पाहीजे. तद्संबंधीचे मा. न्यायाधिशांनी प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची प्रत आवेदनपत्रासोबत जोडणे बंधनकारक राहील.

8) विशिष्ठ न्यायालयात नेमणूक करण्याचे प्राधिकार मा. जिल्हादंडाधिकारी, नांदेड यांचे आहेत. निवड प्रक्रियेच्या बाबतीत निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम राहील.

**महाराष्ट्र विधी अधिकारी (नियुक्ती सेवेच्या शर्ती व मोबदला) नियम 1984 च्या नियम 11 नुसार राहतील.**
**निवड झालेल्या उमेदवारांना संदर्भ क्र. 06 अन्वये खालीलप्रमाणे मानधन (फी) मिळेल :-**

| | |
|---|---|
| **1) प्रतिदिन परिणामकारक सुनावणीसाठी फी** | **रू. 600/-** |
| **2) एका जामिन अर्जाच्या विरोधाकरीता** | **रू. 400/-** |
| **3) प्रतिदिन एकूण कमाल मर्यादा** | **रू. 1000/-** |

**(टिप : - एकापेक्षा जास्त सुनावणी किंवा जामिन अर्जाच्या विरोधाचे काम चालविले तरी प्रतिदिन कमाल मर्यादा रू. 1000/- राहील)**

**<u>निवड झालेल्या उमेदवारास खालील अटी बंधनकारक राहतील : -</u>**

1) निवड झालेल्या पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यास जिल्हा अंतर्गत न्यायालयाच्या आवश्यकतेनुसार जिल्हयामधील कोणत्याही तालूक्याच्या न्यायालयात काम करणे बंधनकारक राहील.

2) प्रस्तूतची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने त्यांना प्रतिनियुक्तीवर इतर न्यायालयाच्या ठिकाणी पाठविले जाणार नाही. तथापी त्यांना स्वखर्चाने तेथे जावे लागेल. अधिसूचनेमध्ये नमुद फी (मानधन) व्यतिरीक्त ते कुठल्याही इतर भत्यास व मानधनास पात्र असणार नाहीत. तसेच त्यांना शासकीय सदस्यत्वाचे इतर कोणतेही अधिकर असणार नाहीत.

3) या पदासाठीची निवड ही भविष्यात स्थायी शासन सेवेत सामावून घेण्याचा अधिकार राहणार नाही त्याबाबत कोणतेही विनंती अर्ज विचारात घेता येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

4) शासनातर्फे प्रकरणात बाजू मांडण्याचे निवड झालेल्या उमेदवारांचे आद्य कर्तव्य असल्याने त्यांनी शासनाचे ज्या प्रकरणात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या संबंध येतो अशा प्रकरणात अभ्यासपूर्व शासनाची बाजू मांडणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

5) शासनाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या ज्या प्रकरणात संबंध येतील अशा कोणत्याही प्रकरणात खाजगी व्यक्ती तर्फे खटल्यात काम करता येणार नाही.

6) नियुक्तीपूर्वी शासनाविरुद्ध ज्या फौजदारी खटला / प्रकरणात उमेदवाराचे वकीलपत्र असेल त्या फौजदारी खटल्यात शासनातर्फे काम करता येणार नाही. अशा स्वरूपाचा खटला चालविण्यास ते असमर्थ असल्याबद्दल त्यांनी सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता नांदेड यांना कळविणे त्यांचेवर बंधनकारक राहील. जेणेकरून कामवाटप प्रक्रिया सुलभ होईल. प्रस्तूतच्या पुर्तते अभावी उद्भवणाऱ्या परिणामाची जबाबदारी व्यक्तीशा संबंधीत विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यावर राहील व शासनास त्याच्या विरुद्ध पुर्तते अभावी कायदेशीर कार्यवाही करता येईल.

7) प्रतिदिनी किती शासकीय फौजदारी खटल्यात त्यांनी काम पाहीले याचे सविस्तर माहिती विहित नमुन्यात मा. न्यायदंडाधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्रासह सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता नांदेड यांचे कार्यालयात दाखल करणे त्यांचेवर बंधनकारक राहील व त्यावरून त्यांचे मानधन (फी) चे देयक तयार करणे शक्य व सुलभ होईल.

8) सदरच्या नियुक्त्या ह्या केवळ तात्पुरत्या स्वरूपाच्या असल्याने पॅनलवरील विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांचे काम समाधनकारक दिसून न आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता कामाचे वाटप बंद करून त्यांचे नाव पॅनलवरून कमी करण्याची शिफारस मा.जिल्हादंडाधिकारी नांदेड यांचेकडे करण्यात येईल.

AGKokate

**सौ. अनुराधा गोविंद कोकाटे,**
**सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, नांदेड**

**प्रतिलिपी अधीसूचनेच्या प्रतीसह प्रसिद्धीसाठी अग्रेषित : -**

1) मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, मुख्य न्यायालय नांदेड
2) मा. जिल्हा सरकारी वकील, जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड
3) मा. सर्व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, जिल्हा नांदेड
4) मा. सर्व तालूका न्यायदंडाधिकारी, जिल्हा नांदेड

**नोट :- अ. क्र. 1 ते 4 यांना सविनय विनंती करण्यात येते की, प्रस्तूत अधिसूचनेची प्रत नोटीस बोर्डावर लावण्याची व्यवस्था करावी.**

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-
1) मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
2) मा.प्रमुख जिल्हा न्यायाधिश, जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड
3) मा. जिल्हा पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड
4) मा. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई
5) मा. उपसंचालक, अभियोग संचालनालय, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद

**सोबत :** अर्जाचा नमुना

AGKokate

**सौ. अनुराधा गोविंद कोकाटे,**
**सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता**
**नांदेड**

**<u>अर्जदाराने अर्ज खालील पत्यावर पाठवावेत -</u>**

***सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता,***
***नांदेड यांचे कार्यालय डॉ.काबरा यांच्या दवाखान्या शेजारी,***
***पोलीस अधीक्षक कार्यालया समोर, वजिराबाद,***
***नांदेड ☎ 02462 - 248124***

# Application Form

(Proforma of the Application for the appointment of Special Assistant Public Prosecutor)

Photograph

1 Post Applied for :-

2 Full Name of Applicant (Starting with Surname) Father's/Husband's Name :- Shri/Smt.

3 Residential address. :-

| Permanent Address | | | Temporary Address | | |
|---|---|---|---|---|---|
| Room/Flat/Bldg.No. | | | Room/Flat/Bldg.No. | | |
| Village /Post | | | Village /Post | | |
| Taluka. | | | Taluka. | | |
| Road | | | Road | | |
| District/City | | | District/City | | |
| State | | | State | | |
| Pin | | | Pin | | |
| Phone No. | (O) | | Phone No. | (O) | |
| | (R) | | | (R) | |
| Mobile No. | | | Mobile No. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | (a) Date of Birth.<br>(b) Age on the date of advertisement | | | :- |
| | Years | Month | Days | :- |
| 5 | Place of Birth | | | :- |
| 6 | PAN Number | | | :- |
| 7 | Whether Candidate is Domicile in the State of Maharashtra | | | :- |
| 8 | Whether enrolled as member of the Bar council of Maharashtra and Goa.<br>(*specify the registration no. and date.*) | | | :- |

| 9 | Educational Qualification and experience | :- |
|---|---|---|
| | a) Details of the examination passed for graduate, Law graduate, Post graduate :- | |

| Name of the examination | Name of University/Board/Institution | Class | Year of passing |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

b) Total number of years of practice :-

| Name of the courts where practised | Total no. of Civil matters conducted | Total no. of Criminal matters conducted | Total no. of Service matters conducted |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

10) Previous employment] if any :-

| Post held | Date of Joining | Date of leaving | Reasons for |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

11) Languages known :-
(Read -------------- ------------- --------------- ------------)
(Write -------------- ------------- --------------- ------------)
(Speak -------------- ------------- --------------- ------------)

12) Whether the Applicant is involved:-
in any Criminal Offence

(*to specify the registration no. and date*.)
If so, whether convicted/acquitted

## **DECLARATION**

I , do hereby state that whatever is stated hereinabove is true and correct to the best of my knowledge and belief and if any information is found to be false and incorrect, my appointment as Law Officer, if made shall stand automatically cancelled and I shall be liable for further necessary action.

Date :-

Signature of Applicant.

Place :-

N.B.

1. Candidate shall append the required true copied of testimonials, certificates and documents, dully attested.
2. Canvassing in any for shall disqualify the applications.
3. The applicant shall produce the Character certificate from any to Senior Advocates/Senior Counsels.
4. The applicant shall affix his recent passport size photograph with his signature.